MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Jan. To Mar. 2024
Issue 49, Vol-02

Date of Publication
1 Jan. 2024

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Date of Publication
1 Jan. 2024

# Vidyawarta™

International Multilingual Research Journal

www.विद्यावार्ता.कॉम
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

Impact Factor 9.154 iijif

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

Harshwardhan Publication Pvt.Ltd. International Multilingual Research Journal ISO 9001:2015

http://www.printingarea.blogspot.com

# INDEX

01) GOODS AND SERVICES TAX....
**Dr. Jaikishan Thakur, Gulbarga, Karnatsaka** ||10

02) Use of ICT in Library
**Ms. Nanda Balbhimrao Karanjkar, Nanded** ||14

03) Influence of Indian culture on Indonesia
**Dr. Md. Shamsuddin Mallick, Calcutta** ||17

04) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लष्करातील शस्त्रास्त्रे — एक दृष्टिक्षेप
**सहा. प्रा. रविंद्र बाबुराव बाविस्कर, मुक्रमाबाद, जि. नांदेड** ||21

05) महाराष्ट्रातील कातकरी जमातीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास
**डॉ. संते लालचंद्र रामचंद्र, शिवळे, जिल्हा ठाणे** ||23

06) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण
**डॉ. कन्नाडे एम. के., कोल्हापूर** ||28

07) पंजाब राज्य के राजकीय विद्यालयों में सतत् एवं व्यापक मूल्याँकन....
**हर्ष कुमार, डॉ. सुरेन्द्र कुमार सहारण, संगरिया** ||31

08) नारीवादी परिप्रेक्ष्य का समाजशास्त्रीय विश्लेषण
**डॉ. भावना जोशी, रूद्रपुर (ऊधमसिंह नगर)** ||34

09) शहरी शिक्षा—महाविद्यालयों के महिला एवं पुरुष शिक्षण प्रशिक्षणार्थियों....
**प्रतिमां मिश्रा, डॉ. दीपक शुक्ला, मुरैना (म.प्र.)** ||43

10) केन्द्रीय एवं राजकीय विद्यालयों की उच्च माध्यमिक कक्षाओं में....
**उदयवीर सिंह नौहवार, डॉ. ललित मोहन शर्मा, आगरा** ||47

11) शहरी एवं ग्रामीण उच्चतर माध्यमिक स्तर के विद्यार्थियों की सृजनात्मकता....
**उर्वशी श्रीवास्तव, डॉ. दीपक शुक्ला, मुरैना (म.प्र.)** ||51

12) मानवीयता, मूल्य चेतना और समकालीन हिंदी कहानी
**डॉ. ममता शर्मा, अहमदाबाद** ||54

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

13) छात्र—छात्राओं के व्यक्तित्व विकास मे राष्ट्रीय सेवा योजना....
**Dr. Kavita Parvanda, Panna (M.P.)** ||59

14) छठी शताब्दी ईसा पूर्व की धार्मिक क्रांति में बौद्ध धर्म का विश्लेषण
**डॉ. राजेश सिंह, अभिनव मिश्रा, अयोध्या** ||62

15) अस्मिताबोध के आईने में शेखर जोशी की कहानियाँ
**प्रिया कुमारी, प्रो. तारु एस. पवार, कासरगोड, पेरिया** ||65

16) प्रथम स्वाधीनता संघर्ष की चेतना एवं हिंदी पत्रकारिता
**लक्ष्य सिंह चौधरी, बदायूँ** ||69

17) काव्यप्रकाशदिशा गुणीभूतव्यंग्य: विमर्श:
**डॉ. विभा गोस्वामी, वृन्दावन, जिला— मथुरा (उ. प्र.)** ||72

18) संत तुकारामांच्या अभंगलेखनामागील प्रयोजन व प्रतिमासृष्टी
**डॉ. सुरेश वि. जाधव, श्री. गजानन शिंदे** ||79

19) मानवाला आध्यात्मिक ज्ञानाची गरज
**श्री. शिलिसिद्ध बिळेणी पटेवडीयार, प्रा. डॉ. वाय. एस. राऊत, धारवाड** ||83

20) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या धार्मिक आणि सामाजिक विचारांचा अभ्यास
**डॉ. संभाजी संतोष पाटील, देवपुर, धुळे** ||86

21) माध्यमिक विद्यालयों की स्वच्छता जागरूकता के प्रति शिक्षक एवं....
**रीता यादव, डॉ. शिखा वर्मा, अयोध्या** ||92

22) उत्तर प्रदेश की अर्थव्यवस्था
**डॉ. बबली चन्द्रा, मण्डी धनौरा, अमरोहा** ||97

23) आदिवासी साहित्य में नारी चिंतन
**डॉ. भगवानसिंह सोलंकी, डॉ. दिप्तीबेन प्रजापति, आणंद (गुजरात)** ||103

24) जनजातीय इतिहास लेखन की प्रवृत्तियों का अनुशीलन
**श्याम सुन्दर कुमार, बोधगया** ||107

25) भारतीय शिक्षा में पुस्तकालय की भूमिका : एक अध्ययन
**Ravi Prakash, Meerut (U.P.)** ||112

www.vidyawarta.com/03 _ http://www.printingarea.blogspot.com

26) भारतीय लोकतंत्र में 'एक देश एक चुनाव' की मुद्दे : एक....
**Dr. RAHUL PASWAN** || 114

27) भारत में जनजातीय जीवन एवं उनका विकास : एक संक्षिप्त अध्ययन
**डॉ. कुसुम लता, भरतपुर, राजस्थान** ||**120**

28) २१ वी सदी का हिंदी साहित्य — सामाजिक एवं सांस्कृतिक सरोकार
**डॉ. केशव क्षीरसागर, धाराशिव** ||**124**

29) राष्ट्रीय कौशल विकास योजनाओं का अध्ययन....
**सूर्य प्रकाश, ग्वालियर म.प्र.** ||**127**

30) दलित साहित्य के चेतना स्वर : मोहनदास नैमिशराय
**डॉ. चंद्रकांत नरसप्पा एकलारे, मुखेड, जि. नांदेड** ||**131**

31) 'पाप' (२००४) में स्त्री प्रश्न
**डॉ. आशीष कुमार, वर्धा, महाराष्ट्र** ||**134**

32) अंधायुग : मानवीय मूल्यों की तलाश
**बिरजानन्द मिश्र, ग्वालियर, (म.प्र.)** ||**137**

33) Beyond Stone, Metal and Form: Understanding the Culture....
**Kulwinder Singh, Chandigarh** ||**142**

34) Challenges and Benefits of the Cashless Policies
**Dr. N. Leela, Thiruvallur, Tamilnadu** ||**146**

35) Revival of Poetic Tradition in the Neo-Classical Arabic Poetry
**Dr. M. Nurul Amin Sheikh, Halakura, Dhubri, Assam** ||**149**

36) National Education Policy 2020 : Assessment and Evaluation
**Dr. Durgesh Pal, Dr. Abhilasha Kaushik, Gorakhpur, Uttar Pradesh** ||**154**

37) DR. B. R. AMBEDKAR: A GREAT PATRIOT AND MULTI DIMENSIONAL....
**AKANKSHA SINGH, MATHURA (UP)** ||**160**

38) Management Teachings from the Bhagavad Geeta :An Ancient text
**Gaurav, Dr. Shashikant Mani Tripathi** ||**166**

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

39) Feminine Perspective: A Study of Indian English Women Poets
**Dr. Prahlad Das, Saktiashram** || 168

40) मृदुला गर्ग के उपन्यासों में स्त्री विमर्श
**संजय कुमार, हजारीबाग (झारखण्ड)** **||174**

41) शहरी उच्चतर माध्यमिक स्तर के विद्यार्थियों की बुद्धिलब्धि का उनके विषय....
**महेश कुमार मौर्य, डॉ. श्रुति चव्हाण, ग्वालियर (म.प्र.)** **||177**

42) दलित कवितेतून व्यक्त झालेली आई
**प्रा. ए. के मोरमारे, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर** **||180**

43) शब्दरत्नाकरे योगसम्बद्धशब्दानां पाणिनीयदिशा विश्लेषणं तथा....
**पि. पुण्यवती, तिरुपति** **||183**

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

06

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण

**डॉ. कन्नाडे एम. के.**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

**********

**प्रस्तावना**

भारतीय घटनेचे शिल्पकार आणि दलित साहित्यांचे प्रेरणास्थान असे ज्यांचे वर्णन केले जाते. ते भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर हे भारत मातेचे थोर सुपुत्र होते. ते जसे दलितांचे नेते, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ तसेच ते स्त्रियांचे कैवारीही होते.दलिताप्रमाणेच समाजात हीन वागणूक देण्यात येणाऱ्या स्त्रियांबद्दल बाबासाहेबांना अपार सहानुभूती होती. स्त्रियांच्या उद्धारासाठी त्यांनी घटस्फोट, पोटगी, पुनर्विवाह, वडिलोपार्जित संपत्ती वारसा, दत्तक घेणे वगैरे हक्क देणाऱ्या हिंदु कोड बिलावा आग्रह धरला.

बाबासाहेबांच्या मते, कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे. यावरून करता येते.

भारतीय समाजव्यवस्थेत घट्ट रूजलेली विषमता नष्ट करण्यासाठी, स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, पितृसत्ताक संस्कृतीचा पगडा, स्त्रियांचे मनाविरूद्ध झालेले विवाह, लादली जाणारी बांळतपणे यावर उपाययोजना किंवा ही परिस्थिती बदलण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय. असे विचार त्यांनी मांडले. त्यांनी केवळ विचारच मानले नाही तर औरंगाबादला महाविद्यालयाची स्थापना केली.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ:**

१. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना समान हक्क आणि अधिकार देऊन त्यांना स्व सामर्थ्याची जाणीव करून देणे

२. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात स्त्रियांना विशेष स्थान देणे. त्यांना शिक्षण आरोग्य व रोजगार यामध्ये समान संधी देऊन समान वागणूक देणे. कामाच्या ठिकाणी पाळणाघरे, वृद्धाश्रम, शैक्षणिक संस्था याचे जाळी वाढवणे यासारख्या योजना आखून स्त्रियांना सक्षम करणे.

**संशोधनाचे उद्देश:**

१ स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय स्त्रियांची स्थिती अभ्यासणे.

२. स्त्रियांचे हक्क, अधिकार आणि समान न्याय मिळवून देण्यामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या योगदानाचा आढावा घेणे.

३. भारतीय संविधानातील स्त्रीविषयक मूलभूत हक्क व कायद्याचा आढावा घेणे.

**तथ्य संकलन व विश्लेषण :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केलेला आहे. त्यामध्ये भारताचे संविधान, डॉ. आंबेडकर लिखीत ग्रंथ, भाषणे इ. तसेच मासिके, इतर संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे पुस्तके इत्यादींचा उपयोग केलेला आहे.

**स्वातंत्रपूर्व काळातील स्त्रियांचे स्थान :**

वेदकालीन संस्कृतीचे उदात्तीकरण हिंदू राष्ट्रवाद्यांकडून, अभ्यासकांकडून वारंवार होताना दिसते. पण वेदकाळातील केवळ उच्चवर्णीय स्त्रीलाच ऋचा रचण्याचा व सण समारंभात सहभागी होण्याचा अधिकार होता. म्हणजेच खालच्या वर्गातील स्त्रियांच्या हक्क व स्वातंत्र्याचा अभ्यास केला तर लक्षात येते की, सर्वसामान्य वर्गातील स्त्री ही परावलंबी आणि निम्न दर्जाचे जीवन जगत होती. कारण जातिव्यवस्थेची श्रेष्ठ—कनिष्ठ उतरंड होती. ती त्या त्या वर्णातील स्त्रियांना लागू पडत होती. स्मृती काळात स्त्रीला नैतिकतेचा आदर्श मानले गेले. या काळात पुरुषांवरील परावलंबन वाढल्याने विवाह तिच्यासाठी अनिर्वार्य बनला.

**स्त्रियांसाठी सामाजिक कुप्रथाचा उगम :**

मनुस्मृती काळातील स्त्रियांचा दर्जा अतिशय रसातळाला नेणाऱ्या अनेक सामाजिक प्रथांचा उगम झाला. मनुने सर्वच वर्गातील स्त्रियांना शुद्र लेखून तिचे

स्थान दुय्यम केले. मध्ययुगीन काळातही बाहेरील मुस्लिम आक्रमणामुळे हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी स्त्रियांचे सतीत्व व रक्ताची शुद्धता राखण्यासाठी संबंधी नियम अधिक कठोर केले. या काळामध्ये पडदा पद्धत, विधवाविवाह बंदी, बालविवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह, सतीप्रथा, देवदासी इत्यादी सामाजिक प्रथा सुरू झाल्या. १९ व्या शतकात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सर्वप्रथम स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली. महात्मा फुलेंचा आदर्श घेऊन डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांच्या हक्काचा जाहीरनामाच राज्यघटनेच्या माध्यमातून तयार केला. त्याआधी त्यांनी १९४८ मध्ये हिंदू कोड बिल तयार केलेले दिसून येते.

**डॉ. आंबेडकरांचे स्त्री शिक्षणावरील विचार —**

शिक्षणामुळे जागृती होते. शिक्षण हे माणसाची गुलामी नष्ट करण्याचे साधन मानले आहे याचा अर्थ स्त्रीयामध्येही उच्चशिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय त्यांच्यात स्वत्वाची जाणीव व त्यांच्या जगण्यातील आत्मविश्वास वाढणार नाही आणि आत्मविश्वासाशियाय त्यांची उन्नती होणार नाही कारण आत्मविश्वास हा प्रत्येक व्यक्तीच्या उन्नतीची पहिली पायरी आहे तेव्हा स्त्रियांमध्ये विशेषत: अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या उपेक्षित व असहाय्य स्त्रियात आत्मविश्वास निर्माण झाल्याखेरीज त्यांची, समाजाची व देशाची उन्नती होणार नाही. जर स्त्री वर्गात जागृती झाली तर त्या अस्पृश्य समाजाची फार मोठी प्रगती घडवून आणू शकतात. याची त्यांना जाणीव होती. महिलांच्या संघटीत शक्तीवर, संस्थावर त्यांचा विश्वास होता.

स्त्री शिक्षण विषयीची भूमिका स्पष्ट करताना स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून देताना तुम्ही सर्वप्रथम शिका, स्वच्छता पाळा आपल्या मुलामुलींना शिकवा त्यामुळे देशाचा विकास होईल, तुमच्या अस्मितेचा विकास होईल, तुम्ही पण माणूस आहात अशी तुम्हाला ओळख होईल. कारण 'शिक्षण हे वाघिणीच दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे शिक्षणाचे महत्व त्यांनी स्त्री वर्गासाठी विशद केले. या दोन्ही परिच्छेदावर डॉ. आंबेडकरांना वाटणारी महिलांविषयीची आस्था दिसून येते. प्रत्येकवेळी ते स्त्रियांच्या विकासासाठी शिक्षण किती महत्वाचे आहे हे सांगत. महिलांच्या उन्नयनासाठी हिंदू कोड बिल (हिंदू संहिता विधेयक) हे भारतातील कायदाचा मसुदा होता. हा मसुदा २४ फेब्रुवारी १९४९ ला संसदेत मांडला गेला. स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना रुढी आणि परंपरेपासून सुटका मिळावी यासाठी हा मसुदा तयार केला. आंबेडकरांनी चार वर्षे, एक महिना आणि दोनशे सहा दिवस यावर काम करून हे हिंदू कोड बिल तयार केले. हे बील १९४७ पासून ते फेब्रुवारी १९४९ रोजी संसदेत मांडले. हा मसुदा सात वेगवेगळ्या घटकाशी निगडित कायघ्याचे कलमात रुपांतर करू पहात होता. या बिलावर आंबेडकरांनी तीन वर्षे काम केल त्यांना वाटत होते की जाती व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कमी लेखले जात आहे. त्यासाठी हिंदू कोड बिल असे बनवले पाहिजे ज्यामुळे देशातील सर्व स्त्रियांना समान अधिकार प्राप्त होतील.

या बिलामध्ये आठ अधिनियम बनवले होते.

१) हिंदू विवाह अधिनियम
२) विशेष विवाह अधिनियम
३) दत्तक घेणे, दत्तकग्रहण अल्पायू—संरक्षता अधिनियम
४) हिंदू वारदार अधिनियम
५) दुर्बल आणि साधनहीन कुटुंबातील सदस्य यांना भरण पोषण अधिनियम
६) अप्राप्तवय संरक्षण संबंधी अधिनियम
७) वारसदार अधिनियम
८) हिंदू विधवाला पुनर्विवाह अधिकार अधिनियम

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री मुक्ती चळवळ:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला मुक्ती चळचळीचा पुरस्कार केला. स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी शिक्षणाची आवश्यकता होती. शिक्षित स्त्रिया प्राथमिक पातळीवर आपल्याला कुटंबाचे आणि नंतर समाजाच्या मुक्तीचे भान ठेवेल असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वास होता. हिंदू कोडबिलाच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करतांना कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, समाजातील वर्गावर्गातोल असामानता, स्त्री — पुरुष यांच्यातील असमानता किंवा विषमता तशीच अस्पृर्शीत राहु देऊन आर्थिक समस्यांतील

निगडीत कायदे समंत करीत जाणे म्हणजे आपल्या संविधानाची चेष्टा करणे होय. दुस—या शब्दात सांगायचे म्हणजे शेणाच्या ढिगाऱ्यावर राजप्रसाद बांधण्यासारखे होय. हिंदू स्त्रियांना अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजाकरीता व महिलांची विविध प्रकारच्या शोषणातूनसुटका व्हावी यासाठी हिंदू कोड बिल संसदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य भारतात राज्यघटना तयार केली व त्यातही स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसुत्रीय आधारित समाज निर्मितीसाठी स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करून पुरूषांच्या बरोबरीने अधिकार बहाल केले. महिला सबलीकरण ही आजच्या काळातील एक महत्वाची बाब आहे. या महिला सबलीकरणात प्रामुख्याने स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती, स्त्रीमुक्ती चळवळ, स्त्री स्वातंत्र्य, स्त्रियांचे हक्क व कर्तव्ये, अधिकार भारतीय राज्यघटनेत विविध संकल्पनांचा समावेश केला आहे. प्राचीन काळापासुन स्त्रिया विविध जातीच्या, रूढीच्या बंधनात अडकलेली आहे. हया विविध सामाजिक, आर्थिक, धार्मिक बंधनातून स्त्रियांना मुक्त करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक रूढी आणि परंपरा पासून सुटका मिळावी यासाठी अथक प्रयत्न बाबासाहेबांनी केले. यात इतिहास कालीन स्त्रियांची परिस्तिथीचा अभ्यास, चिंतन,विविध लेख ,पुस्तके मधून लिखाण, विविध आंदोलनामधून कार्य त्यांनी केले .एवढे सगळे करून बाबासाहेब थांबले नाहीत. या सगळ्याला एका कायद्यात बसवले तर ते अगदी सक्षमपणे महिलांना अधिकार मिळेल यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

आजची महिला ही आंबेडकरप्रणित विचारांचा वारसा घेऊन स्वत:ची वाटचाल करतांना दिसते. राजकारण, समाजकारण औद्योगिक क्षेत्रे, साहित्य इत्यादी सर्व क्षेत्र तिने आपल्या बुद्धीचातुर्याने, चिकाटीने काबीज केली आहेत. त्या स्वाभिमानी आणि आत्मनिर्भर बनल्या आहेत. स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा नवा मंत्र प्राप्त करून, त्यांना मुक्त करणारा, तलाक, विवाह संपत्ती, उत्तराधिकारी पोटगी, स्वातंत्र्य इत्यादीविषयी स्वयंनिर्णयशक्ती बहाल करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री जातीला लाभलेले योगदान अतिशय मौलिक आहे.

आज स्त्रियांनी गाजविलेली सभा संम्मेलने आणि त्यानुसार घडत असलेले सामाजिक परिवर्तन हा बाबासाहेब आंबेडकरांकडून मिळालेला वारसा या देशातील महिला कधीही विसरू शकत नाही. आजची स्त्री सुशिक्षित आहे. स्वतंत्र आहे, कमावती आहे. याचे श्रेय फुले दापंत्यांना जसे जाते. तसेच आजची स्त्री स्वत:च्या हक्काबद्दल सजग आहे. तिच्या हक्कासाठी तिला लढता येते. तिला सामाजिक, राजकीय गाठत समजतात. तिच्याविरूद्ध झालेल्या अन्यायाविरूद्ध तिला दाद मागता येते. या अनेक गोष्टीचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते. भारतीय स्त्रीला कायदेशीरदृष्ट्या साक्षर आणि सक्षम बनविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज प्रत्येक भारतीय स्त्रीसाठी पितृतुल्य आहेत.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. रायपूरकर डॉ वसंत, आंतरराष्ट्रीय संबंध, श्री मंगेश प्रकाशन

२. कुलकर्णी डॉ. रूपा : महिलांचे कैवारी — डॉ. आंबेडकर

३. लिबांळे शरणकुमार, प्रज्ञासुर्य — प्रचार प्रकाशन कोल्हापूर १९९१ पृष्ठ २०९

४. शास्त्री, सोहनलाल, हिंदू कोड बिल और डॉ. आंबेडकर, सम्यक प्रकाशन

५. धनंजय कीर, विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर, मानस आणि तत्त्वविचार, श्री गजानन बुक डेपो पुणे

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अनुवादक गौतम शिंदे, जातिप्रथेचे विध्वंसन, सुगावा प्रकाशन, पुणे ऑक्टोबर १९९२

७. युवराज दीक्षित, डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे समाज आणि साहित्य विचार, सुगम प्रकाशन, अमरावती एप्रिल २०१२

८. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी सुधारित आवृत्ती ६ डिसेंबर २००६

९. https://www.deshdoot.com/trends/latest-news-nashik-maharashtra-day-celebrate-labor-cow-dr-babasaheb-ambedkar